गोपनीय

क्रमांक : का.स./बैठक/२६९

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : १३ सप्टेंबर, २०२१

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०८ सप्टेंबर, २०२१ रोजी झालेल्या २६९व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

सचिव,
**कार्यकारी समिती**

**प्रति :**

| | | |
|---|---|---|
| मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | अध्यक्ष |
| श्री. जयंत कुमार बांठिया<br>१००३/१००४, १० वा मजला,<br>बिल्डींग नं.३-ए, ग्रीन एकर्स,<br>लोखंडवाला कॉम्प्लेक्स, अंधेरी (प),<br>मुंबई – ४०० ०५३ | - | सदस्य |
| डॉ. शिरीष संख्ये<br>संचालक, मेकॅन्सी अँड कंपनी,<br>एक्सप्रेस टॉवर, २१ वा मजला,<br>नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१. | - | सदस्य |
| महानगर आयुक्त<br>मुं. म. प्र. वि. प्राधिकरण | - | सदस्य |
| महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका,<br>मुंबई - ४०० ००१. | - | सदस्य |
| प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | सदस्य |

प्रधान सचिव, - सदस्य
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

व्यवस्थापकीय संचालक, - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

**निमंत्रित :**

अपर मुख्य सचिव,
वित्त विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

अपर मुख्य सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

अतिरिक्त महानगर आयुक्त/ प्रकल्प संचालक, मुं.म.प्र.वि.प्रा.

अतिरिक्त महानगर आयुक्त (२), मुं.म.प्र.वि.प्रा.

सह महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्रा.

**प्रत अग्रेषित :-**
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

****

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या २६९व्या बैठकीचे कार्यवृत्त

**दिनांक : ०८ सप्टेंबर, २०२१ (मंगळवार)**

**वेळ : सकाळी १०.०० वाजता**

**स्थळ : मा. मुख्य सचिव यांचे समिती कक्ष**
**६वा मजला, मंत्रालय,**
**मुंबई – ४०० ०३२.**
**दूरचित्रसंवाद (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) द्वारे**

**उपस्थित सदस्य :**

श्री. सीताराम कुंटे - अध्यक्ष
मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन

डॉ. शिरीष संख्ये - सदस्य

श्री. एस.व्हि.आर.श्रीनिवास - सदस्य
महानगर आयुक्त
मुं. म. प्र. वि. प्राधिकरण

श्री. भूषण गगराणी - सदस्य
प्रधान सचिव (१),
नगर विकास विभाग

डॉ. संजय मुखर्जी - सदस्य
व्यवस्थापकीय संचालक
सिडको, मुंबई

**निमंत्रित :**

श्री. महेश पाठक
प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग

डॉ. सोनिया सेठी
अतिरिक्त महानगर आयुक्त (१)/
प्रकल्प संचालक
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

डॉ. के.एच.गोविंद राज
अतिरिक्त महानगर आयुक्त (२)
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. राहुल कर्डिले
सह-महानगर आयुक्त
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.प्रमोद अहुजा
संचालक (प्रकल्प / कामे),
मेट्रो अंमलबजावणी शाखा,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.राजीव अग्रवाल
संचालक (प्रणाली),
मेट्रो अंमलबजावणी शाखा,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.सुनिल वांढेकर
प्रमुख अभियंता,
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. डी.एल.एन.मुर्ती
प्रमुख, कार्यान्वयन अधिकारी,
मोनोरेल प्रकल्प अंमलबजावणी शाखा,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती सु.भू.पेदे
सचिव, कार्यकारी समिती

बैठकीच्या सुरुवातीस, महानगर आयुक्त यांनी मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे स्वागत केले.

प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीचे तज्ञ सदस्य श्री. ना.वि.मेराणी यांचे दिनांक २४ मे, २०२१ रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या निधनाबाबत एक मिनिट स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली वाहण्यात आली व त्यांच्या दु:खद निधनाबाबत ठराव मंजूर करण्यात आला.

माननीय मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी श्री. एस.व्हि.आर.श्रीनिवास, महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांचे कार्यकारी समितीचे ‘पदसिध्द सदस्य’ यांचे स्वागत व अभिनंदन केले.

तसेच, श्री. एस.व्हि.आर.श्रीनिवास, तत्कालीन प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांनी कार्यकारी समितीचे 'पदसिध्द सदस्य' म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला.

महानगर आयुक्त यांनी श्री. मिलिंद म्हैसकर, प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांचे कार्यकारी समितीचे 'पदसिध्द सदस्य' यांचे स्वागत व अभिनंदन केले.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १० मे, २०२१ रोजी झालेल्या २६८व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १० मे, २०२१ रोजी झालेल्या २६८व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र. ३ : मुंबई मोनोरेल प्रकल्पासाठी १० मोनोरेल गाड्यांची (प्रत्येकी ४ डब्बे) रचना, निर्मिती, पुरवठा, चाचणी व कार्यान्वयन करणे आणि कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणेकरीता कंत्राटदाराची नेमणूक करणेबाबत.**

३.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी मोनोरेल प्रकल्पाकरिता १० नवीन मोनोरेल गाड्या (RST) खरेदी करण्याची गरज व महत्त्व याबद्दल मा. कार्यकारी समितीला अवगत केले. प्राधिकरणामार्फत २० कि. मी. लांबीच्या संत गाडगे महाराज चौक - वडाळा - चेंबूर मार्गिकेवर मोनोरेल प्रकल्प राबविण्यात आला आहे. सद्य:स्थितीत फक्त ७ गाड्या उपलब्ध असल्याकारणाने सदरची सेवा सुमारे १८ मिनिटांच्या अंतराने चालू आहे. परंतु तरीसुद्धा मोनोरेल सेवा तिच्या कमाल क्षमतेपेक्षा कमी चालतेय व प्रवाशांसाठी समाधानकारक सेवा देता येणे शक्य झालेले नाही.

३.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मोनोरेल सेवा प्रत्येकी ६ मिनिटांच्या अंतराने एकूण १७ इतक्या मोनो गाड्यांच्या उपलब्धतेने चालविणे शक्य आहे. सबब, सद्य- परिस्थिती लक्षात घेता नवीन १० मोनो गाड्यांची खरेदी करणे अनिवार्य आहे.

३.३ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, उपरोक्त परिस्थिती लक्षात घेऊन प्राधिकरणाने दि. ८ जुलै, २०१९ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १४८ व्या बैठकीमध्ये १० मोनोरेल गाड्या खरेदीसाठी लागणाऱ्या खर्चास मान्यता दिली आहे. त्यानुसार विषयांकित संदर्भातील निविदा प्रथमतः दि. १३ मार्च, २०१९ रोजी व दि. २४ फेब्रुवारी, २०२० रोजी फेरनिविदा काढण्यात आली होती.

३.४ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सदर निविदेसंदर्भात आढावा बैठकीमध्ये विविध मुद्द्यांवर चर्चा झाली; तसेच निविदापूर्व बैठकीतील प्रसिद्ध केलेले स्पष्टीकरण, चिनी कंपन्यांचा निविदा अटी व शर्ती बदलण्यासाठी लावण्यात आलेला तगादा, कोरोना टाळेबंदीमध्ये केंद्र शासनाने मेक इन इंडिया स्कीम साठी प्रोत्साहन देण्यासाठी जाहीर केलेल्या विविध योजना इ. च्या अनुषंगाने, सदर निविदा रद्द करून; भारतीय कंपन्यांचा सहभाग वाढविण्यासाठी योग्य असे सुधारित पात्रता निकष गृहीत धरून तृतीय वेळी दि. १८ ऑगस्ट, २०२० रोजी नवीन निविदा प्रसिद्ध करण्यात आली.

३.५ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मोनोरेल हे एक विस्तृत वापरलेले तंत्रज्ञान नसल्यामुळे निविदा सादर करतावेळी निविदाकारांना 'विचलन' (Deviations) सादर करण्याची परवानगी देण्यात आली होती. तसेच सदर विचलनांना महत्वपूर्ण विचलन आणि गौण विचलनांमध्ये वर्गीकृत केले जाते. जर एखादया निविदाकाराने निविदेमध्ये महत्वपूर्ण विचलन सादर केली असल्यास त्या निविदाकारास **Substantially Non-Responsive** ठरवण्यात येते. दि. २ मार्च, २०२१ रोजी लिफाफा ‘अ’ (निविदा रक्कम व अनामत रक्कम) व लिफाफा ‘ब’ (तांत्रिक प्रस्ताव) उघडण्यात आले, ज्यामध्ये १. BHEL २. Titagarh आणि ३) Medha या निविदाकारांनी निविदा सादर केली आहे.

३.६ निविदा मूल्यमापन समितीने एकूण ६ बैठकींमध्ये सर्वसाधारण मूल्यमापन आणि तांत्रिक मूल्यमापन करून सर्वंकष अहवाल सादर केला आहे. निविदाकारांनी सादर केलेल्या तांत्रिक प्रस्तावांची छाननी व मूल्यमापन केल्यानंतर निविदा मूल्यमापन समितीने असा अभिप्राय दिला की, Titagarh आणि Medha या दोन्ही निविदाकारांचे तांत्रिक प्रस्ताव **Substantially Responsive** आहेत. BHEL ने मूळ निविदेमध्ये काही महत्वपूर्ण विचलन (Material Deviations) दिल्यामुळे त्यांचा तांत्रिक प्रस्ताव **Substantially Non-Responsive** ठरवण्यात आला. निविदा मूल्यमापन समितीच्या अहवालानुसार आणि त्यांच्या शिफारशींना मिळालेल्या प्राधिकाराच्या मान्यतेनुसार आर्थिक देकारासाठी Titagarh आणि Medha या दोन (२) निविदा पात्र ठरल्या.

दोन पात्र निविदाकारांचे "लिफाफा क : आर्थिक प्रस्ताव" दि. १ जून, २०२१ रोजी उघडण्यात आले असून Titagarh ची प्रस्तावित निविदा रक्कम हि रु. **६०६,००,२३,११८/-** आणि मेधा ची निविदा रक्कम ही रु. **६३१,५५,९२,३३९/-** एवढी आहे.

३.७ सर्वात कमी मूल्य मोजलेली देकार किंमत (Lowest evaluated price bid) ठरवण्यासाठी निविदेतील कलम ४.२.४.४ नुसार निकष गृहीत धरले आहेत. Titagarh ने एकही विचलन सादर केले नसून Medha ने ३ विचलने सादर केले आहेत जसे कि, 1) HVAC Testing, 2) LCD to full LED display and 3) Signalling System. सदर तीन विचलनांची किंमत लक्षात घेतल्यानंतर निविदाकार Medha च्या पुरस्काराची गणना ही **रु. ५८९,९५,४५,३७०/- (कर व इतर शुल्कासहित)** इतकी निर्धारित करण्यात आली.

३.८ दरम्यान, Titagarh ने निविदा मूल्यमापन प्रक्रियेविरोधात मा. उच्च न्यायालय, मुंबई मध्ये प्राधिलेख याचिका (Writ Petition No. 1741 of 2021) दाखल केली आहे. सदर याचिकेमध्ये मुं.म.प्र.वि.प्रा., महाराष्ट्र शासन व इतर निविदाकारांना प्रतिवादी केले आहे. Titagarh ने त्यांच्या याचिकेत, उच्च न्यायालयास सदरच्या याचिकेवर अंतिम निर्णय येईपर्यंत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला सदर निविदेवर पुढील कोणतीही कार्यवाही करणेपासून व आदेश देण्यापासून परावृत्त करावे म्हणून अंतरिम दिलासा मागितला आहे.

त्यावर दि. २७ ऑगस्ट, २०२१ रोजी दोन न्यायाधीशांच्या खंडपीठामध्ये या प्रकरणाची सुनावणी झाली; सदर सुनावणीदरम्यान झालेल्या तपशीलवार युक्तिवादानंतर न्यायालयाने Titagarh ला अंतरिम दिलासा (ad-interim/interim relief) देण्यास नकार दिला. प्राधिकरणाचे वकील (विधी पार्टनर्स) यांच्या दि. २ सप्टेंबर, २०२१ च्या पत्रामध्ये असे नमूद केले आहे की, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि. २७ ऑगस्ट २०२१ च्या आदेशान्वये सदर प्रकरणी स्थगिती दिली नसून, आजच्या तारखेस, सदर निविदा प्रक्रियेवर पुढील कार्यवाही करण्यास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणावर कोणताही प्रतिबंध नाही.

३.९ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, दरम्यान, Titagarh नी मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती (SLP) याचिका दाखल केली आहे. सदर याचिकेवर अद्याप सुनावणी झालेली नाही.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१४१७ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून कार्यकारी समिती याद्वारे Consoritum of Medha Servo Drives Pvt. Ltd. & SMH Rail Sdn. Bhd. यांचा निविदा प्रस्ताव रु. ५८९,९५,४५,३७०/- (कर व इतर शुल्कासहित) एवढ्या किंमतीचा देकार स्विकारण्यास व त्यांची नियुक्ती करण्यास करारनाम्यातील होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास; तसेच मा. उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयामध्ये Titagarh यांनी दाखल केलेल्या अनुक्रमे प्राधिलेख याचिका (WP) व विशेष अनुमती याचिकेच्या (SLP) आदेशास अधीन राहून, मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. ४ : मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या पॅकेज १, २ व ३ मधील संरक्षक कठड्यास सुधारित संरचनेस व मेट्रो मार्गिका शक्यतेच्या तपासणीच्या बाबीच्या अनुषंगाने येणाऱ्या खर्चास तत्वत: मान्यता मिळणेबाबत तसेच अतिरिक्त बाबी व कंत्राटदारांच्या दाव्यांची माहिती देणेबाबत.**

४.१ या प्रस्तावाची माहिती देतांना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या प्रकल्प सल्लागार व कंत्राटदार यांच्या वेळोवेळी झालेल्या संयुक्त बैठकांमध्ये संरक्षक कठडयाच्या सुधारीत संरचनेबाबत तसेच मेट्रो मार्गिकेची शक्यता तपासण्यासाठी सविस्तर चर्चा झाली. मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या कामाच्या वावामध्ये पुलाच्या नवी मुंबईकडे जाणा-या व येणा-या अशा दोन मार्गिका (३+३ मार्ग) आहेत. सदर पुलाच्या मार्गिकांच्या उत्तर व दक्षिणेकडील बाजुस १५५० मि.मी. उंचीचे कॉंक्रीटचे संरक्षक कठडे उभारण्याचा मूळ कामात अंतर्भाव आहे. सदर प्रकारच्या संरक्षक कठडयांच्या रचनेमुळे वाहनातुन प्रवास करणा-या प्रवाशांना प्रवास करतांना

समुद्राची व आजुबाजुच्या परिसराची दृश्यमानता होणार नाही. तसेच प्रवाशांना बोगद्यातुन (Tunnel Effect) प्रवास केल्याप्रमाणे वाटेल.

जागतिक स्तरावर बांधण्यात आलेले विविध सागरी पुल जसे की, हाँगकाँग येथील स्टोन कटर ब्रिज, जपान येथील ॲक्वा- बे ब्रिज आणि मुंबई येथील वांद्रे-वरळी सागरी सेतू येथील संरक्षक कठड्यांची रचना काही प्रमाणात Post & Rail पध्दतीची आहे.

४.२ महानगर आयुक्तांनी असेही सांगितले की, प्राधिकरणाच्या स्तरावर झालेल्या बैठकीदरम्यान ठरल्याप्रमाणे संरक्षक कठडा ॲल्युमिनिअम रेलींग पध्दतीचा बांधण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. सदरच्या संरक्षक कठडयामध्ये खालचा भाग काँक्रीट पध्दतीचा असून त्याची उंची सुमारे ९०५ मि.मी. (३फुट) व ॲल्युमिनिअम रेलींगची उंची सुमारे ६४५ मि.मी. (२ फुट) इतकी आहे. संरक्षक कठडयाची एकूण उंची सुमारे १५५० मि.मि. (५फुट) इतकी ठेवण्यात येणार आहे. सुधारीत संरचना ही ब्रिटीश मानकाप्रमाणे बांधण्याचे प्रस्तावित आहे. सदर संरक्षक कठडयाच्या रचनेत पुलाच्या दुभाजकाच्या संरक्षक कठडयांची (Central Median) उंची ५ फूटाऐवजी ३ फूट करण्याचे देखील प्रस्तावित केले आहे.

४.३ महानगर आयुक्तांनी पुढे असे सांगितले केले की, सदर संरक्षक कठडयाच्या रचनेत उत्तर दिशेकडील बाहेरच्या बाजूस भाभा अणुसंशोधन केंद्राच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने दृष्टीरोधक संरक्षक भिंत (View Barrier) बांधावयाची आहे. या भागातील क्रॅश बॅरिअर वगळता इतर ठिकाणी ४.२ परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे काम करण्यात येईल.

४.४ महानगर आयुक्तांनी असे विषद केले की, सुधारीत संरक्षक कठडयासाठी खालील तीन पर्यायांचा विचार करण्यात आला आहे.

| **अ.क्र.** | **पर्याय** | **लांबी (कि.मी.)** | **अंदाजित रक्कम (₹ कोटी)** |
|---|---|---|---|
| १ | संपुर्ण पुल आणि पोहोच मार्ग | ५६.२६ | ३५३ |
| २ | फक्त मुख्य पुलाकरीता | ३४.०६ | २१४ |
| ३ | मुख्य पुलाचे ५०% भागामध्ये | १७.०३ | १०७ |

सदर सुधारीत रचनेच्या संरक्षक कठडयाचे बांधकाम करण्यासाठी जागेवर झालेल्या प्रत्यक्ष कामाच्या प्रमाणात योग्य तो पर्याय ठरविण्यात येईल.

४.५ महानगर आयुक्तांनी यापुढे असेही सांगितले की, मुंबई पारबंदर प्रकल्प हा महत्त्वाकांक्षी व मोठा प्रकल्प असुन सदर प्रकल्पाच्या मार्गिकेवरून मेट्रो प्रकल्पाची देखील अंमलबजावणी केल्यास सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमध्ये मोठया प्रमाणात सुधारणा होईल आणि त्याचा सामान्य जनतेस फायदा होईल.

४.६ मा. मुख्य सचिव व अध्यक्ष कार्यकारी समिती यांनी चर्चेच्या दरम्यान मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या मार्गिकेवरुन मेट्रो प्रकल्प सुरु करण्याबाबतच्या शक्यतेबाबत असे मत व्यक्त केले की, शिवडी कडील बाजूस मेट्रोकरीता तीव्र वळणे आणि उतार असू शकतात त्यामुळे योग्य ती काळजी घेण्यात यावी. मेट्रो प्रकल्पाच्या शक्याशक्यते बाबतची सुसाध्यता कंत्राटदाराच्या स्ट्रक्चरल डिझाईन सल्लागारांकडून घेणे योग्य ठरेल.

४.७ महानगर आयुक्तांनी पुढे असे नमूद केले की, मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या पॅकेज- १, २ व ३ मधील कामामध्ये कंत्राटदारांनी अतिरिक्त बाबी व भरपाईच्या दाव्यांची मागणी केली असून त्याबाबतची प्रकल्प सल्लागारांमार्फत छानननी प्रगतीपथावर आहे. सदर बाब कार्यकारी समितीस माहितीस्तव सादर करण्यात येत आहे.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१४१८ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे कलम ३ चे उपकलम (२) व (३) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या पॅकेज १, २ व ३ करीता खालील प्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता देत आहे.

१. संरक्षक कठडयाच्या सुधारीत संरचनेमुळे अतिरिक्त कामाच्या अनुषंगाने कंत्राटदाराना सुमारे ₹.३५३.३१ कोटी पर्यंत अदा करण्यास तत्वत: (In Principle) मान्यता देण्यात येत आहे.

२. मेट्रो मार्गिकेची शक्यता तपासण्यासाठी कंत्राटदारांच्या स्ट्रक्चरल डिझाईन सल्लागारांना अतिरिक्त मानधन सुमारे ₹.३,००,००,०००/- पर्यंत अदा करण्यास तत्वत: (In Principle) मान्यता देण्यात येत आहे.

३. मुंबई पारबंदर प्रकल्प पॅकेज-१ मधील कामामध्ये कंत्राटदाराने मागणी केल्याप्रमाणे अतिरिक्त बाबींची रक्कम ₹. १४०,६२,९३,५६१/- व भरपाईंच्या दाव्यांची रक्कम ₹.२८३,७१,७०,५३६/- याबाबत नोंद घेतली.

४. मुंबई पारबंदर प्रकल्प पॅकेज-२ मधील कामामध्ये कंत्राटदाराने मागणी केल्याप्रमाणे अतिरिक्त बाबींची रक्कम ₹.१५२,९७,००,३०९/- व भरपाईंच्या दाव्यांची रक्कम ₹.४५७,००,००,०००/- याबाबत नोंद घेतली.

५. मुंबई पारबंदर प्रकल्प पॅकेज-३ मधील कामामध्ये कंत्राटदाराने मागणी केल्याप्रमाणे अतिरिक्त बाबींची रक्कम ₹.९९,१६,६३,२००/- व भरपाईंच्या दाव्यांची रक्कम ₹.४७,५८,००,०००/- याबाबत नोंद घेतली.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरणाने उपरोक्त नमूद केलेला मुद्दा क्र. १ व २ बाबत कार्यकारी समितीला वेळोवेळी अवगत करण्यात यावे तसेच प्राधिकरणाने उपरोक्त नमूद केलेला मुद्दा क्र. ३, ४ व ५ कंत्राटदारांच्या दाव्यांची गुणवत्तेनुसार अंतिम निर्णय घेऊन त्याबाबत कार्यकारी समितीला अवगत करण्यात यावे.**

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरणाने महानगर आयुक्तांना मूळ कंत्राटाच्या रक्कमेच्या २०% पर्यंतच्या वाढीव खर्चास मान्यता देण्याचे अधिकार प्रदान केलेले आहेत. त्यास अनुसरुन कंत्राटदारांनी मागणी केलेल्या अतिरिक्त बाबी व भरपाईंच्या दाव्यांची छाननी करुन त्यास सक्षम स्तरावर मान्यता घेऊन याबाबतची पुढील कार्यवाही करण्यात यावी."

**बाब क्र. ५ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वेगवेगळया ठिकाणी असलेल्या मिळकतींच्या व मालमत्तांच्या व्यवस्थापनाकरिता संस्थेची तीन वर्षे कालावधीसाठी नेमणूक करण्याबाबत.**

५.१ या प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाच्या वेगवेगळया ठिकाणी असलेल्या जमिनींचे तसेच मालमत्तेचे व्यवस्थापन व परिरक्षण करण्यासाठी कार्यकारी समितीच्या दिनांक २८ ऑगस्ट, २०१७ रोजी झालेल्या २५४ व्या बैठकीमधील ठराव क्रमांक १३३४ अन्वये मान्यता दिल्यानुसार नियुक्त करण्यात आलेल्या संस्थांचा नियुक्ती कालावधी ३१ ऑक्टोंबर, २०२० रोजी संपुष्टात आला असल्याने प्राधिकरणाने नवाकाळ व हिंदुस्थान टाइम्स या वृत्तपत्रामध्ये दिनांक ०४ नोव्हेंबर, २०२० रोजी निविदा /सुचना प्रकाशित करुन

दिनांक ०४ नोव्हेंबर, २०२० पासून निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक ०३ डिसेंबर, २०२० निश्चित केला होता. परंतु त्यामध्ये वेळोवेळी वाढ करुन अंतिमत: दिनांक ०४ फेब्रुवारी, २०२१ निश्चित केला होता. सदर निविदेत ८०% गुण हे तांत्रिक गुणवत्तेकरीता व २०% गुण वित्तीय गुणवत्तेकरीता आधारित केले होते. प्राप्त झालेल्या निविदाकारांचा लिफाफा - 'अ' (निविदा शुल्क व इसारा रक्कम) दिनांक ०५ फेब्रुवारी, २०२१ रोजी उघडण्यात आल्यानंतर निविदा शुल्क व इसारा रक्कम भरणा केल्याची खात्री करुन खालील निविदाकारांचा लिफाफा – 'ब' मधील तांत्रिक (पात्रता प्रस्ताव) उघडण्यात आला :-

| **अ.क्र.** | **निविदाकाराचे नाव** |
|---|---|
| १. | मे. बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इंडिया) लि. |
| २. | मे. सिंग इंटेलिजन्स सिक्युरिटी प्रा. लि. |
| ३. | मे. विशाल प्रोटेक्शन फोर्स. |
| ४. | मे. ईगल सिक्युरिटी अ‍ॅण्ड पर्सोनेल सर्व्हिसेस. |
| ५. | मे. एस.एस. एन्टरप्रायझेस (मे. ट्रिग एस. एस. व्हेंचर्स) |

अनु. क्र. (५) चे निविदाकारांनी मे. ट्रिग एस. एस. व्हेंचर्स या नावाने जॉईन्ट व्हेंचर्स मध्ये निविदा सादर केली असून, मे. एस. एस. एन्टरप्रायझेस व मे. ट्रिग डिटेक्टीव्ह प्रा. लि. हे भागीदार आहेत.

५.२ महानगर आयुक्तांनी असेही सांगितले की, निविदाकारांनी सादर केलेल्या पात्रता प्रस्तावाची छाननी केली असता, उपरोक्त परि-५.१ मधील सर्व निविदाकार पात्रतेच्या अटी पूर्ण करीत आहेत. सदर पात्र निविदाकारांना निविदा छाननी समिती समोर सादरीकरण करण्यास सांगण्यात आले होते. त्याप्रमाणे दिनांक ०९ एप्रिल, २०२१ रोजी संबंधीत निविदाकारांचे निविदा छाननी समिती समोर सादरीकरण करण्यात येऊन, निविदा छाननी समितीने संबंधीत संस्थांना पात्रतेच्या प्रस्तावाबाबत दिलेल्या गुणाबाबतचा अहवाल बाब टिप्पणी सोबतच्या जोडपत्र - "ड" प्रमाणे सादर केला आहे. या अहवालानुसार सर्व निविदाकार ७५ व त्या पेक्षा अधिक गुण प्राप्त करीत असल्याने निविदेतील अटी / शर्तीनुसार सर्वच निविदाकार पात्र ठरत असल्याने त्यांचा लिफाफा – 'क' मधील वित्तीय प्रस्ताव दिनांक ०७ मे, २०२१ रोजी उघडण्यात आले. वित्तीय प्रस्तावात सर्वच निविदाकारांनी

समान दर निविदेत केले असून, निविदा पत्रकात नमूद कोष्टकानूसार त्यांना समान म्हणजेच १०० गुण प्राप्त होत आहेत. त्यांनी निविदेत केलेला दर १८% वस्तु व सेवा करासह नमूद केला असल्याने, सदरचा वस्तु व सेवा कर वगळून पर्यवेक्षक व परिकर यांचे प्राप्त दर खालीलप्रमाणे आहेत :-

| अ.क्र. | तपशिल | प्राप्त दर (रु.) | १८% वस्तु व सेवा कर (रु.) | निव्वळ (रु.) | पूर्णांकात (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १. | पर्यवेक्षक | २४,४२६.७५ | ३,७२६.११ | २०,७००.६३ | २०,७०१/- |
| २. | परिकर | २२,९७५.५८ | ३,५०४.७५ | १९,४७०.८३ | १९,४७१/- |

५.३ त्यांनतर महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, निविदा पत्रकातील व निविदा पूर्व बैठकीच्या कार्यवृत्तातील तरतुदींनुसार, पात्रता प्रस्ताव आणि वित्तीय प्रस्तावाकरीता मिळालेल्या गुणांना अनुक्रमे ८०% व २०% याप्रमाणात एकत्र केले असता, एकूण १०० गुणांपैकी प्राप्त निविदाकारांना बाब टिप्पणीच्या परि-८ मध्ये नमूद केल्यानुसार गुण प्राप्त होतात. याप्रमाणे पर्यवेक्षक व परिकर प्रवर्गासाठी मे. विशाल प्रोटेक्शन फोर्स व मे. ईगल सिक्युरिटी ॲण्ड पर्सोनेल सर्व्हिसेस यांना सर्वात अधिक व समान ९८.१३ गुण प्राप्त होतात. तथापि, सर्वच निविदाकारांनी समान दर निविदित केला असल्याने, परि-५.२ मध्ये नमूद केल्यानुसार दर स्विकारणे आवश्यक आहे. प्राधिकरणास सर्वसाधारणपणे एकापेक्षा जास्त संस्थांची आवश्यकता असल्याने, उपरोक्त नमूद २ संस्थांसह उर्वरीत ३ पात्र संस्थांची नेमणूक पुढील ३ वर्षे कालावधीकरीता करता येईल. सबब, या सर्व ५ निविदाकारांना परि-५.२ मध्ये नमूद केलेल्या दराने आवश्यक असलेले मनुष्यबळ पुरविण्याचा देकार स्विकारतील या अधिन राहून प्राधिकरणाच्या वेगवेगळया ठिकाणी असलेल्या मिळकत व मालमत्तेचे व्यवस्थापनाकरिता प्रति महापर्यवेक्षक (Supervisor) रु.२०,७०१/- व परिकर (Attendant) रु. १९,४७१/- या दराने सर्व अनुषंगिक भत्ते, सवलती / फायदे धरुन व कर वगळून, आगामी तीन वर्षांकरिता नेमणूक करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

५.४ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, निविदा प्रक्रिये दरम्यान बाब टिप्पणीच्या परिच्छेद-२ मध्ये नमूद केल्यानुसार नेमणूक केलेल्या संस्थांचा कालावधी दिनांक ३१ ऑक्टोंबर, २०२० रोजी संपला असल्याने, मालमत्ता व मिळकतीची परिरक्षणाची बाब विचारात घेता, या संस्थांचा नियुक्ती कालावधी सध्याची चालू असलेली निविदा प्रक्रिया पूर्ण करुन, नव्याने संस्थांची

नियुक्ती करेपर्यंत वाढविणे क्रमप्राप्त आहे. सबब सदरची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन नव्याने संस्थांची नियुक्ती करेपर्यंत या संस्थांचा नियुक्ती कालावधीत मुदतवाढ देण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १४१९:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** असा ठराव करण्यात येतो की, मुंबई महानगर प्रदेश विकास अधिनियम, १९७४च्या कलम ७ चे उप कलम (३) पोट कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे (१) मे. विशाल प्रोटेक्शन फोर्स, (२) मे. ईगल सिक्युरिटी ॲन्ड पसोर्नेल सर्व्हिस, (३) मे. बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इंडिया) लि., (४) मे. सिंग इंटेलिजन्स सिक्युरिटी प्रा. लि., (५) मे. ट्रिग एस. एस. व्हेंन्चर्स या संस्थांची रु. २०,७०१/- प्रति पर्यवेक्षक (Supervisor) व रु. १९,४७१/- प्रति परिकर (Attendant) प्रति महा, सर्व अनुषंगिक भत्ते, सवलती / फायदे धरुन व कर वगळून, किमान वेतन अधिनियम, १९४८ अन्वये महागाई भत्त्यामध्ये (DA) होणाऱ्या सुधारणेसह सदरचा दर त्याप्रमाणे सुधारीत करण्याच्या अधिन राहुन, ३ वर्षासाठी निविदेतील अटी व शर्तीवर नियुक्ती करण्याच्या प्रस्तावास मान्यता देत आहे. जर काही निविदाकारांनी देकार स्विकारण्यास असमर्थता दर्शविल्यास, त्यांची अनामत रक्कम जप्त करण्यांत येऊन, उर्वरित निविदाकारांची नेमणूक करण्यात यावी.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर ठरावाची अंमलबजावणी करण्यास व त्यास आवश्यक असलेले मनुष्यबळ वेळोवेळी आवश्यकतेनुसार फेरफार करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करीत आहे."

..१३/-

**बाब क्र. ६ : प्राधिकरणाचे दिनांक ३१.०३.२०२१ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक कालावधीचे लेखे.**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३१ मार्च, २०२१ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली. त्यानंतर, प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन लेख्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली.

**निर्णय: सदर त्रैमासिक अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**बाब क्र. ७ : प्राधिकरणाचे दिनांक ३०.०६.२०२१ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक कालावधीचे लेखे.**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३० जून, २०२१ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली. त्यानंतर, प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन लेख्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली.

**निर्णय: सदर त्रैमासिक अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**बाब क्र. ८ : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल – दिनांक ०१ एप्रिल, २०२१ ते दिनांक ३० जून, २०२१**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ०१ एप्रिल, २०२१ ते दिनांक ३० जून, २०२१ दरम्यान केलेल्या गुंतवणूकीची संक्षिप्त माहिती दिली. कार्यकारी समितीने दिनांक ०१ एप्रिल, २०२१ ते दिनांक ३० जून, २०२१ पर्यंतच्या गुंतवणूक अहवालाची नोंद घेतली.

**निर्णय : सदर गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**पटल बाब क्र. ०१: प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील "मुख्य अभियंता (रेलपथ)" पदावरील नियुक्तीस मंजूरी देण्याबाबत.**

१.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देतांना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशात एकूण ११८ कि.मी. उन्नत मेट्रो मार्ग अग्रक्रमाने राबविण्यासाठी आवश्यक असलेल्या तांत्रिक व अतांत्रिक मनुष्यबळाची गरज विचारात घेता प्राधिकरणाच्या दिनांक १९ ऑक्टोबर, २०१६ रोजी झालेल्या १४१व्या बैठकीत ठराव क्र.१३८२ अन्वये सदर प्रकल्पाकरीता प्राधिकरणाच्या

आस्थापनेवर तांत्रिक संवर्गात नव्याने पदे निर्माण करण्यात आली आहेत. मेट्रो प्रकल्पाकरीता निर्माण करण्यात आलेल्या पदांपैकी "मुख्य अभियंता (रेलपथ)" वेतन मॅट्रीक्स एस-२९ : १३११००-२१६६०० हे वरिष्ठ वेतनश्रेणीतील विभाग प्रमुख दर्जाचे पद असल्याने प्राधिकरणाचे नियुक्ती प्राधिकारी या नात्याने सदर पदावर नेमणूकीकरिता कार्यकारी समितीच्या मान्यतेच्या अधिन राहून खालीलप्रमाणे विभागीय पदोन्नती समिती गठित करण्यात आली :-

| | |
|---|---|
| अतिरिक्त महानगर आयुक्त (१) | अध्यक्ष |
| सह महानगर आयुक्त | सदस्य |
| वित्तीय सल्लागार | सदस्य |
| संचालक (प्रकल्प), मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी शाखा | सदस्य |
| श्री.पी.एम.यादव, प्रमुख (नगर रचना) (मागासवर्गीयांचे प्रतिनिधी) | सदस्य |
| तहसीलदार (आस्थापना) | सदस्य सचिव |

१.२ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, उपरोक्त निवड समितीने "मुख्य अभियंता (रेलपथ)" हे पद पदोन्नतीने भरण्याकरिता दिनांक १६ जून, २०२१ रोजी विभागीय पदोन्नती समितीची बैठक आयोजित करुन अतिरिक्त मुख्य अभियंता (रेलपथ) या संवर्गातील पदोन्नतीच्या विचारक्षेत्रातील अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्याबाबतचा प्रस्ताव विभागीय पदोन्नती समिती समोर सादर करण्यात आला होता. श्री.मधुकर रावजी खरात, अतिरिक्त मुख्य अभियंता (रेलपथ) हे मुख्य अभियंता (रेलपथ) या पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार आवश्यक असलेली शैक्षणिक व अनुभवाची अर्हता धारण करीत असल्यामुळे, विभागीय पदोन्नती समितीने श्री.मधुकर रावजी खरात यांची "मुख्य अभियंता (रेलपथ)" या पदावर पदोन्नतीने नियुक्तीसाठी एकमताने शिफारस केली. तरी कार्यकारी समितीस विनंती करण्यात येत आहे की, श्री. मधुकर रावजी खरात यांची मुख्य अभियंता (रेलपथ) या पदावर नेमणूकीस मंजूरी देण्यात यावी.

..१५/-

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**<u>ठराव क्र. १४२० :</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (एक) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे श्री.मधुकर रावजी खरात, अतिरिक्त मुख्य अभियंता (रेलपथ) यांना वेतन मॅट्रीक्स एस-२९ : १३११००-२१६६०० "मुख्य अभियंता (रेलपथ)" या पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देत आहे. तसेच उपरोक्त परिच्छेद १.१ अनुसार गठीत केलेल्या पदोन्नती समितीस याद्वारे मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

*******